# सुचना

शासनाचे सहसचिव यांचे शासन निर्णय क्रमाक-एमसीओ-२०१७ /प्र.क्र.६९/नवि-१४दिनांक ७/३/२०१७ मधे नमुद केल्यानुसार राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी क मधील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांना नियुक्ती प्राधिकारी म्हणून घेषित करण्यात आल्यामुळे महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा विद्गुत एकूण पद -२, महाराष्ट्र नगर परिषद लेखा परीक्षण व लेखा सेवा सहायक लेखापाल एकूण पद -५, नगर पंचायत मधील लेखापाल - ४ पद , लेखापरीक्षक-४ पद, एकूण १५ पदांची जाहिरात रद्द करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र नगर परिषद अग्निशमन सेवा-सहा.अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक श्रेणी-२ एकूण पद-१२ पदांची परीक्षा नियोजित दिनांकास (दि.२६.३.२०१७) घेण्यात येणार आहे. अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक श्रेणी क-२ पदाकरीता अर्ज करण्याचा दिनांक १७/३/२०१७ पर्यत राहील व बँकेत चलान भरण्याचा दिनांक १८/३/२०१७ राहील याची नोंद घ्यावी.

दि.१४/३/२०१७

**सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
**जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती**

राज्यातील नगर परिषद कर्मचारी / राज्यस्तरीय
संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- एमसीओ-२०१७/प्र.क्र.६९/नवि-१४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०७.०३.२०१७

**संदर्भ :-** १. नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. एमसीओ-१२०३/१२४६/सीआर-१७५/०३/नवि-१४, दि. ११.०१.२००७

२. नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. एमसीओ -१००८/३६५/सीआर-७६/८/नवि-१४, दि. २८.०१.२०१०

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगर परिषदेमधील दैनंदिन काम व विकास कामांचे सुसूत्रीकरण व्हावे, त्यांच्या सेवा शर्ती, वेतनश्रेणी यांच्यात समानता असावी व विहित शैक्षणिक अर्हता पात्र जबाबदार अधिकारी नगर परिषद प्रशासनास उपलब्ध व्हावेत म्हणून शासनाने उपरोक्त संदर्भ क्र १ मधील दि. ११.०१.२००७ च्या शासन निर्णयान्वये एकूण ६ महाराष्ट्र नगर परिषद कर्मचारी राज्यस्तरीय संवर्ग स्थापन केलेले आहेत.

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर नागरीकरणाच्या प्रमाणामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे. नागरीकरणाच्या अनुषंगाने सर्वसाधारण जनतेच्या नागरी प्रशासनाकडून मोठया प्रमाणावर अपेक्षा आहेत त्या पार्श्वभूमीवर नागरी स्थानिक संस्थंमध्ये पदे रिक्त ठेवणे उचित नाही. उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये राज्यस्तरीय संवर्गातील ६ सेवा या जनतेच्या दैनंदिन बाबींशी संबंधित आहेत.

सुधारित सेवा शर्ती नियम, २००६ ची अधिसूचना व संदर्भीय क्र. २ येथील दि. २८.०१.२०१० च्या अधिसूचने अन्वये राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणींचे नियुक्ती प्राधिकारी विहित केलेले आहेत. सदर राज्यस्तरीय संवर्गातील पदांची विभागणी जिल्हा/ विभागीय/ राज्यस्तरीय अशी करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित पदांचे नियुक्ती प्राधिकारी हे जिल्हा तथा विभागीय पातळीवरील असल्याने व त्या पदावर भरती जिल्हा/विभागीय पातळीवर केल्यामुळे पुरेशा प्रमाणात स्पर्धा न झाल्यामुळे त्या दर्जाचे अधिकारी/ कर्मचारी उपलब्ध होण्याची शक्यता कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे राज्यस्तरीय म्हणून त्यामध्ये एकजिनसीपणा रहात नाही. त्यामुळे राज्यस्तरीय संवर्गातील पदांची जिल्हा/ विभागीय/ राज्यस्तरीय अशी विभागणी न करता ही सर्व पदे राज्यस्तरीय करण्याची, तसेच सदर पदे भरताना एकसुत्रीपणा आणण्याकरीता कार्यपध्दती अवलंबिण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यस्तरीय संवर्गातील पदे भरतांना एकसुत्रीपणा यावा तसेच सदर संवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. शासन निर्णय, वित्त विभाग दि. ०२.०६.२०१५ मधील पद भरतीवरील निर्बंध शिथिल करून महाराष्ट्र नगर परिषद राज्यस्तरीय संवर्गातील ५ संवर्गांची (अग्नीशमन सेवा संवर्ग वगळता) १४८३ पदे विहित प्रक्रिया अवलंबून सरळसेवेने भरण्यात यावीत.

२. दि. ११.०१.२००७ व दि. २८.०१.२०१० मधील अधिसूचनांनुसार राज्य संवर्गातील पदांची जिल्हा/ विभागीय/ राज्यस्तरीय अशी वर्गवारी न ठेवता राज्यस्तरीय पदे अशी वर्गवारी करण्यात येत आहे.

३. या राज्यस्तरीय संवर्गातील पदांकरीता आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना नियुक्ती प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

४. उपरोक्त राज्यस्तरीय संवर्गातील सरळसेवेने भरावयाची पदे दि. ११.०१.२००७ व दि. २८.०१.२०१० अन्वये पदोन्नती/ समावेशनाने भरती करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत भरण्यास शासन मान्यता देत आहे.

५. महाराष्ट्र नगर परिषद वित्त व लेखा सेवा संवर्गातील पदांकरीता सध्या असलेली C.A., वाणिज्य शाखेतील पदवी व M.I.C.W. या शैक्षणिक अर्हते ऐवजी "वाणिज्य शाखेतील पदवी" अशी अर्हता विहित करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संबंधित नियमांमध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

६. स्वच्छता निरिक्षक या पदाचा समावेश राज्यस्तरीय संवर्गामध्ये करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे. स्वच्छता निरिक्षकांची रिक्त असलेली पदे भरण्यात यावीत. तसेच आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना या पदाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. स्वच्छता निरीक्षक या पदांचे समावेशन राज्यस्तरीय संवर्गामध्ये करण्याकरीता संबंधित नियमांमध्ये तरतुद करण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

७. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी सदर पदभरती नवनिर्मित नगर परिषदा/ नगर पंचायतींमध्ये शासन निर्णय दि. ०५.०७.२०१६ अन्वये नव्याने निर्माण करण्यात आलेली पदे सदर शासन निर्णयामध्ये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरुन सत्वर भरावीत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३०७१६०९०५४९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Jayasingrao N Patil
Date: 2017.03.07 16:11:16 +05'30'

(ज.ना.पाटील)
शासनाचे सहसचिव

प्रति,

१. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व मुख्याधिकारी
५. प्रधान सचिव, यांचे विशेष कार्य अधिकारी (नवि-२)
६. निवडनस्ती (नवि-१४) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.

# जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती

# नगरपरिषदांमध्ये व नगर पंचायती मधील राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहिरात.

जाहिरात क्र.कक्ष-२०/स्थानि/अका/संवर्ग पदभरती/कावि- ३०१ /२०१७ दिनांक १/३/२०१७

मा. प्रधान सचिव नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे परिपत्रक क्र.नपप्रस २०१५/ प्र.क्र. ११४/ २०१५ /कक्ष-६ /४३१ दिनांक २२/०2/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी अमरावती यांचे आस्थापनेवरील अमरावती जिल्हयातील नगरपरिषदांमध्ये व नगर पंचायत मधील राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी क मधील रिक्त पदे **सरळसेवेने** भरावयाचीआहे. त्यानुसार इच्छुक व पात्र उमेदवाराकडून दिनांक १६/३/२०१७ पर्यंत फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

कार्यालयाचे नाव : जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती

एकुण रिक्त पदे - २५ पदनिहाय रिक्त पदाचा तपशील खालीलप्रमाणे

**1)संवर्ग : महाराष्ट्र न.प. अभियांत्रिकी सेवा (विद्युत)**

२) पदाचे नाव : विद्युत पर्यवेक्षक

३) भरावयाची एकुण पदे :- २

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | -- | - | - | १ |
| वि.जा.(अ) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | | - | - | - | - | - | - | - | - |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकुण | २ | - | - | - | - | - | -- | - | २ |

वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

**<u>नगर परीषद मधील लेखा परीक्षण व लेखा सेवा सहाय्यक लेखापाल पदासाठी</u>**

**2) संवर्ग : महाराष्ट्र न.प. लेखा परीक्षण व लेखा सेवा सहाय्यक लेखापाल**

१) पदाचे नाव : सहाय्यक लेखापाल - 2 / सहाय्यक लेखापरीक्षक : - 3

२) भरावयाची एकुण पदे : 5

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | २ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| एकुण | ५ | १ | - | - | - | - | - | - | ४ |

वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

***<u>नगर पंचायत मधील लेखापाल व लेखापरीक्षक पदासाठी</u>***

१) पदाचे नाव : - लेखापाल

२) भरावयाची एकुण पदे :- 4

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | १ | ० | - | - | - | - | - | - | १ |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | - | - | - | - | - | - | - | - | - |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | २ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| एकुण | ४ | १ | - | - | - | - | - | - | ३ |

१ - : पदाचे नाव (लेखापरीक्षक

२) भरावयाची एकुण पदे : 4

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | - | - | - | - | - | - | - | - | - |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | २ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| एकुण | ४ | १ | - | - | - | - | - | - | ३ |

२) संवर्ग : महाराष्ट्र न.प. अग्निशमन सेवा

१) पदाचे नाव : सहा. अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक श्रेणी क -२ २) भरावयाची एकुण पदे : 1०

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | ० | ० | - | - | - | - | - | - | - |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | ३ | १ | - | - | - | - | - | - | २ |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | ४ | २ | १ | - | - | - | १ | - | - |
| एकुण | १० | ३ | १ | - | - | - | १ | - | ५ |

वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा पर्यवेक्षक (विद्युत) (श्रेणी- क)<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे. ४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी (बी.ई.विद्युत) किंवा पदविका (डी.ई. विद्युत) आवश्यक<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |
| | महा. नगरपरिषद लेखापरीक्षण व लेखा सेवा सहाय्यक लेखापाल सहाय्यक लेखापरीक्षक श्रेणी-क - वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२००<br><br>महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग असाधारण क्रमाक -१४ ,Urban Development Department मंत्रालय दिनांक २८ जानेवारी २०१० चे अधिसूचने मधील अ.क्र. ७ | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवीत्तर पदवी असणे (M.Com) किंवा वाणिज्य शाखेचा पदवीधर (B.Com) सोबत Membership of institution of costs and Works Accountant (I.C.W.A.) आवश्यक आहे. किंवा सनदी लेखापाल असणे आवश्यक (the institute of Charrtered Accounts of India.)<br>४.एम.एस.सी.आय.टी उत्तीर्ण असणे आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| | मधील Serial No.३ मधील ( C ) नुसार लेखापाल व लेखापरिक्षक पदाकरीता दिलेली पात्रता | ४मराठी भाषेचे .. पुरेसे ज्ञान आवश्यक |
| | | |
| | महा. नगरपरिषद अग्निशमन सेवा क- २ श्रेणी- क सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक<br>वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रे.पे.२८००<br><br>संचालक अग्निशमन सेवा ,महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,मुंबई दिनांक २६ एप्रिल २०१६ चे परिपत्रक क्रमांक मअसे/२०१६/ ३२- एफ /६५५ नुसार मुंबई येथील सब ऑफीसर्स कोर्स चे प्रमाणपत्र असलेले उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करु शकतील | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक<br>२. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम (Sub Officers Course) उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी मुंबई येथील sub Officer Course उत्तीर्ण असणे आवश्यक (दि.२६ एप्रिल २०१६ नुसार )<br>३. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>४.. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |

नगर परिषद कर्मचा-यांसाठी खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा पर्यवेक्षक (विद्युत) (श्रेणी-क)<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०-- ग्र.पे. ४२०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची संबंधित अभियांत्रिकी पदवी / पदविका<br>२. विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक ( विहीत केलेली असल्यास )<br>३. एम.एस.सी.आय.टी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>४. वय ४५ वर्षापेक्ष कमि असणे आवश्यक<br>५. नगर परिषदे मधे कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र |
|---|---|---|
| | महा.नगरपरिषद लेखापरीक्षक व लेखा सेवा सहाय्यक लेखापाल सहाय्यक लेखापरीक्षक श्रेणी -क<br>वेतनश्रेणी ९३००-३४८०० - ग्र.पे. ४२००<br>महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग असाधारण क्रमाक -१४ ,Urban Development Department मंत्रालय दिनांक २८ जानेवारी २०१० चे अधिसूचने मधील अ.क्र. ७ मधील Serial No.३ मधील ( C ) नुसार लेखापाल व लेखापरिक्षक पदाकरीता दिलेली पात्रता | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवीत्तर पदवी असणे (M.Com) किंवा वाणिज्य शाखेचा पदवीधर (B.Com) तसेच Membership of institution of cost and Works Accountant (I.C.W.A.) आवश्यक आहे. किंवा सनदी लेखापाल असणे आवश्यक (the institute of Chartered Accounts of India.)<br>नगर पालीका कर्मचारी असल्यास ३ वर्षाचा संबंधित कामाचा अनुभव असणे आवश्यक, वाणिज्य पदविधर असल्यास ५ वर्षाचा संबंधित कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक<br>३. (विहीत केलेली असल्यास) किंवा विभागीय परीक्षा उत्त्ीर्ण असणे आवश्यक<br>४.एम.एस.सी.आय.टी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>५.वय ४५ पेक्षा कमि असावे.<br>६. नगर परिषदे मधे कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र |
| | | |
| | महा.नगरपरिषद अग्निशमन सेवा क- २ श्रेणी क सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रे.पे. २८०० | १. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१०+२) उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२. राष्ट्रीय अग्नीशमन सेवा महाविद्यालय नागपूर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम |

| | | |
|---|---|---|
| | संचालक अग्निशमन सेवा ,महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,मुंबई दिनांक २६ एप्रिल २०१६ चे परिपत्रक क्रमांक मअसे/२०१६/ ३२- एफ /६५५ नुसार मुंबई येथील सब ऑफीसर्स कोर्स चे प्रमाणपत्र असलेले उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करु शकतील | sub Officer Course उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी मुंबई<br><br>येथील sub Officer Course उत्तीर्ण असणे आवश्यक (दि.२६ एप्रिल २०१६ नुसार )<br>३.लीडींग फायरमन या पदावर ५ वर्ष काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक<br>४. (विहीत केलेली असल्यास ) विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>५. वय ४५ पेक्षा कमि असावे.<br>६. नगर परिषदे मधे कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र |

**टिप :-**

१) सदर पदामध्ये कमी जास्त बदल होण्याचा संभव आहे. म्हणुन याबद्दल उमेदवारांची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी अमरावती यांनी राखुन ठेवले आहेत.

**पदांकरीता वयोमर्यादाः-**

१. उपरोक्त पदाकरीता दिनांक ३१/ १२/२०१६ रोजीची वयोमर्यादा गणली जाईल.

२. उपरोक्त पदाकरीता दिनांक ३१/१२/२०१६ रोजीचे खुल्या उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. मागासवर्गीय उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. तथापी उन्नत व प्रगत गटामध्ये क्रिमीलेयर( creamy Layer) मोडणा-या विजा.अ, भज-ब ,भजक , भजड , विमाप्र आणि इ.मा.व प्रवर्गातील उमेदवारांना ही सवलत लागु नाही.

४. सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थ सहाय या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीधारक अंशकालीन उमेदवारांना वयोमर्यादा ४६ वर्ष इतकी असेल.

५. खेळाडु उमेदवारांकरीता वयोमर्यादेची अट कमाल वयोमर्यादा अधिक ५ वर्षापर्यंत गुणवत्तेनुसार शिथिल करण्यात येईल.

६. माजी सैनिक :- सशस्त्र दलात किमान ६ महिने सलग सेवा केलेल्या माजी सैनिक मधील त्यांची सशस्त्र दलात केलेली अखंड सेवा काल अधिक ३ वर्ष एवढा काल त्यांच्या विहीत दिनांकाच्या वयातुन वगळुन त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षा पर्यंत राहील.

७. अपंग उमेदवाराचे बाबतीत उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. अपंग प्रवर्गातील उमेदवाराचे किमान अपंगत्वाचे प्रमाणे ४० टक्के असल्याबाबतच्या स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापुर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबधीत पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्यांची अंतीम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

८. स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील.

९. प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

परिक्षा शुल्क :-

खुला प्रवर्ग :- रु. ३००/- मागास प्रवर्ग रु. १५०/-

उक्त परिक्षा शुल्क बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच बँकेच्या वेळेत बँकेत रोखीने भरणे आवश्यक आहे . माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे.

टिपः- वरील शुल्क हे जिल्हा निवड समितीसाठी आहे. याशिवाय शुल्क जिल्हा निवड समितीच्या नावाने जमा करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र कडुन रु. ६०/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**विशेष सुचना :-**

१ अतिरीक्त संवर्ग, आंतर विभागीय समायोजन , विभागीय बदली व इतर विभागीय पदांचा आढावा, इत्यादी कारणामुळे पदसंख्येत ( पदसंख्या कमी / जास्त होणे ) आरक्षण / समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२ नियुक्ती देणेचे नियमात , पदसंख्येत / आरक्षणात बदल करणे, रद्य करणेचे अधिकार अध्यक्ष , जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अमरावती यांना राहतील.

३ शासनाने भरतीबाबत / नियुक्ती बाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय , परिपत्रके, आदेश इत्यादी लागु राहतील.

४ महिला / माजी सैनिक /अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातुन समांतर आरक्षण विरहीत म्हणुन भरली जातील.

५. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुधारीत शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो

**अर्ज करण्याची पध्दत :-**

१ प्रस्तुत पदाकरीता फक्त अधिकृत संकतेस्थळावरुन विहीत पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२ पात्र उमेदवाराला वेब- बेस्ड ( Web-Based ) ऑनलाईन अर्ज या वेबसाईटव्दारे दि. ०२.०३.२०१७ ते दि. १५.०३.२०१७ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकांनतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना www.amravati.nic.in व www.Collnrs.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. व अर्ज www.Collnrs.in या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज परिपुर्ण भरल्यांनतर बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत फी भरण्याचे चलन ०३ प्रतीमध्ये उपलब्ध होईल. ( उमेदवाराची प्रत , बँकेची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढुन परिक्षा शुल्क बँकेत रोखीने या चलान मार्फतच चालन वर दिलेल्या सुचनेतील तारखेनंतर परंतु १६/३/२०१७ पर्यंत बँकेच्या वेळेत भरणे आवश्यक राहील. उमेदवाराने फी बँक ऑफ महाराष्ट्र च्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या तिन प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत बँक ऑफ महाराष्ट्र बँकेकडुन परत मिळेल त्यापैकी जिल्हा निवड समितीची प्रत , अशा उमेदवाराने कागदपत्राच्या छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करावी . सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी केली जाणार नाही तसेच चलनाची मुळ प्रत परिक्षेच्या दिवशी सोबत आणावी.

4 बँकेमध्ये विहीत परिक्षा शुल्काचा चलनाव्दारे भरणा केल्यानंतर बँकेकडुन प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद संकेतस्थळावर जाऊन करावी व ऑनलाईन अर्ज अपडेट करावा . अर्ज सादर करण्याची ( परिक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने Transaction ID नोंदविणे ) आवश्यक आहे असे न केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

५. बँकेकडुन प्राप्त झालेला Transaction ID एकापेक्षा अधिक अर्जाकरीता वापरु नये Transaction ID एकापेक्षा अधिक अर्जाकरीता वापरल्यास एकही अर्ज विचारात घेतला जाणार नाहीत.
६ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सदर करतांना उमेदवाराजवळ स्वतः चा चालु ई -मेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी व्दारे होणार असल्याने अचुक - ई मेल आयडी नोंदवीणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्यावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक आहे तसेच स्वतःचा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनुसार विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.
७ ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाच्या बाबींचा तपशिल www.Collnrs.in वर उपलब्ध आहे.
८ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर दि. १८.०३.२०१७ ते २१.०३.२०७ पर्यंत www.Collnrs.in संकेततस्थळावरुन परिक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे.
प्रवेशपत्रावर उमेदवाराने त्याचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्रावर चिकटवुन त्यावर राजपत्रित अधिका-यांकडुन सांक्षाकीत करुन घ्यावे.

**पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती अटी व शर्ती :-**

१ उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे अन्य कागदपत्रे जोडणे आवश्यक नाही. परंतु ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रूटी राहील्यास व अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील या बाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत / दिशाभुल माहिती भरलेले निदर्शनास आल्यास सबंधीत उमेदवारावर फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
२ अंतिम निवड
अ) उमेदवाराची अंतिम निवड ही लेखी परीक्षेमधे मिळालेल्या एकुण गुणांच्या आधारे केली जाईल.
ब) एकाच स्थानासाठी ( Position) दोन किंवा उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१.अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास उच्च शैक्षणीक अर्हता धारण करणारे उमेदवार त्यांनतर
२.मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती ( १४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जोनवारी १९९०- पुर्वीच्या २८ तत्सम जमाती) भटक्या जमाती इतर मागासवर्ग या क्रमाने त्यांनतर
३. शारीरीक दृष्टया अपंग असलेले उमेदवार त्यांनतर
४.माजी सैनिक असलेले उमेदवार त्यांनतर
५.स्वातंत्र सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार
६.वय (वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल ) वरील प्रत्येक संवर्गामध्ये माहिलांना क्रम वरती लागेल.) वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल

७.उमेदवाराची लेखी परिक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही.

नियुक्ती पुर्वी, मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अदययावत नॉनक्रिमीलेअर दाखला , तसेच आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकीत प्रमाणपत्रे (साक्षांकन हे केंद्र / राज्यशासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्टमास्तर प्राचार्य व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे) इ.ची छाननी संबधीत नियुक्ती प्राधिकारी स्तरावर केली जाईल.

त्यावेळी मुळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाहीत/ नियुक्ती रद्द होईल तसेच या पदासंबधी शासनाकडुन आवश्यक सहमती प्राप्त झाल्यानंतरच उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

८ अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे.

९ सदर पदांसाठी आवश्यक अर्हता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

१० गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमेदवारांना मुळ कागदपत्राची तपासणी करण्याकरीता बोलावण्यात येईल. उमेदवारांना कागदपत्रे तपासणीच्या वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती प्रमाणपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

११.उक्त पदांसाठी छाननी न करता जाहीरातीनुसार परिपुर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी परिक्षा केंद्राचा सांकेतांक क्रमांक , वेळ व दिनांक इत्यादी तपशिल www.amravati.nic.in व **www.Collnrs.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र **www.Collnrs.in** या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.

१२. लेखी परिक्षेसाठी व कागदपत्रांच्या छाननीसाठी उमेदवारास स्वखर्चाने यावे लागेल.

१३.जिल्हा रोजगार व स्वयरोजगार मार्गदर्शन केंद्र अमरावती या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१४. विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/ निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे ध् आवश्यक राहील.

१५. नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारांना मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे आदेशास अधिन राहुन जिल्हयातील कोणत्याही नगरपरिषदांमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास ३० दिवसाचे आत रुजु होणे आवश्यक राहील.

१६. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी -२०११/ प्र.क्र १०६४/२०११/१६६- ब दिनांक १२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबधीत जात पडताळणी समितीकडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१७. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती , विशेष मागासवर्ग , इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासुन अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर ) तत्व विजा अ , भजब , भजक ,भजड , विमाप्र व इमाव यांना लागु

आहे. सदर प्रवर्गातील उमेदवाराकडे ३१ मार्च २०१६ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे . नॉन क्रिमीलेअरचे तत्व अनुसुचित जाती / जमाती व्यतिरीक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागु राहील.

१८. उक्त नमुद पदासाठी घेण्यात येणा-या लेखी परिक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणा-या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र , उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे ( नॉन क्रिमीलेअर ) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र , रहिवासी प्रमाणपत्र संगणक हाताळणी , अर्हता प्रमाणपत्र , जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे पत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक ०१/०७/२००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र विवाहीत / अविवाहीत उमेदवारांनी सदर करणे अनिवार्य आहे.

१९. शासन वित्त विभाग निर्णय क्र. अनियो/१०/०५८/१२६ सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि.०१ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना ( म्हणजे म.ना.सेवा ( निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से ( निवृतीवेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह योजना लागु होणार नाही.

२०. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२१. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरवण्यात येईल.

२२. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झ ााला आहे असे उमेदवारांनी समजु नये.

२३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना व भरतीची जाहिरात www.amravati.nic.in व www.Collnrs.in संकेततस्थळावर उपलब्ध आहे.

२४.ऑनलाईन पध्दतीने उमेदवाराने अर्ज भरल्यांनतर जोपर्यंत उमेदवार परिक्षा शुल्क भरल्याचे Transaction ID ऑनलाईन उमेदवारी अर्जावर स्वतः बिनचुक Update करीत नाही तोपर्यंत त्याचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

**समांतर आरक्षणांतर्गत असलेल्या कोटयासाठी अटी व शर्ती**

अ) अंशकालीन उमेदवारासाठी :-

अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहीजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्याच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्राच्या तपासणीच्यावेळी सदर करणे आवश्यक राहील.

ब) माजी सैनिक उमेदवारासाठी :-गुणवत्तायादीमध्ये येणा-या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकीत / सांक्षाकीत प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासण्याच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या

कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडुन पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

क)महिलांसाठी असलेले आरक्षण :- महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/प्र.क्र.४१५/कावि २ दिनांक २५ मे २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी वर्ष २०१५-१६ या कालावधी करीता वैध असलेले (अर्थात दिनांक ३१/३/२०१६ पर्यत वैध असलेले ) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्या बाबतचे प्रमाणपत्र तपासणीच्या सादर करणे आवश्यक आहे.

ड) अतिउच्च गुणवत्ता धारक खेळाडु उमेदवारासाठी :-

अतिउच्च गुणवत्ता धारक खेळाडुसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रक्रीभो-२००२/प्रक्र-६८ /क्रीयुसे-२ दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील खेळाडु प्रमाणपत्र हे सदर शासन निर्णयासोबत परिशिष्ठ अ मधे नमुद खेळामध्ये राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावर प्राविण्य मिळविल्याचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे असावे लेखी परीक्षेत निवड झालेल्या खेळाडु उमेदवारांचे खेळा बाबतचे प्रमाणपत्र हे क्री डा संचालनालय पुणे यांचे कार्यालयातून पडताळणी करुन वैध असलेले प्रमाणपत्र असल्याशिवाय खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश दिला जाणार नाही.

इ) भूकंप्रग्रस्त उमेदवारांसाठी गुण व गुणवत्ता यादीमधे येणा-या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हाधिकारी ) यांचे भुकंपग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहीत केलेले प्रमाणपत्र कागदपत्रांच्या तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

फ) प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी :- गुणवत्ता यादीमधे येणा-या प्रकल्पग्रुस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हा पुर्नवसन अधिकारी ) यांचे प्रकल्पग्रस्त असल्याबाबत शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहीत केलेले प्रमाणपत्राच्या कागदपत्राच्या तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**परीक्षेचे स्वरुप व निवड पध्दती**

| पदचे संकेतांक | पदनाम | परीक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | | एकूण |
| ब | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा संवर्ग (विद्युत्) (श्रेणी -क) | २०० | | २०० |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखपरिक्षण सेवा संवर्ग (श्रेणी -क) | २०० | | २०० |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा संवर्ग (श्रेणी क-२) | २०० | | २०० |

**परीक्षेचे स्वरुप :-**

१) परीक्षा ही ओएमआर पध्दतीने होणार आहे .

२) लेखी परीक्षा एकुण गुण २०० (भाग १ व भाग २ मिळून )

भाग १ - ५० प्रश्न प्रती प्रश्न २ गुण एकूण गुण १०० (मराठी इंग्रजी सामान्य ज्ञान बौध्दिक क्षमता चाचणी )

भाग २- ५० प्रश्न प्रती प्रश्न २ गुण एकूण गुण १०० ( व्यावसायीक अभ्यासक्रमाशी संबंधित )

**टिप :-**

१. एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवून देखील मुलाखतीस गैरहजर राहील्यास निवड करता येणार नाही मात्र एखादया उमेदवाराला मुलाखतीस शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेच्या गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा उमेदवारांची निवड करण्यात येईल. शासन सामान्य प्रशासन विभागाकडे निर्णय क्रमांक प्रनिम-२००७/प्रक्र.४६/०७/१३/अ दिंनांक १९/१०/२००७ मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षेमधे प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर निवड करण्यात येईल लेखी परीक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल त्यासाठी १०० प्रश्नांना प्रत्येकी २ गुण याप्रमाणे एकूण २०० गुण असतील १०० प्रश्नापैकी ५० प्रश्न संबंधित सेवेच्या (पदाच्या ) आवश्यक शैक्षणिक पात्रतेच्या स्तरावरील दर्जाचे असते उर्वरीत ५० प्रश्न मराठी इंग्रजी व सामान्य क्षमता चाचणीशी निगडीत असतील निगेटीव्ह मार्कींग पध्दत असणार नाही लेखी परीक्षा दिनांक २६/०३/२०१७ रोजी घेण्यात येईल लेखी परीक्षेमधून पात्र होणा-या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीचा दिनांक नंतर कळविला जाईल.लेखी परीक्षेमधे उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

लेखी परीक्षेत बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेले गुण www.amravati.nic.in व www.Collnrs.in या संकेत स्थळावर पाहता येईल या गुणवत्ता यादीनुसार सामाजीक / समांतर आरक्षणा निहाय अंतरिम गुणवत्तायादी उक्त संकेत स्थळावर जाहीर केली जाईल.
परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असते अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभागाकडे शासन निर्णय दिनांक २७ जुन २००८ मधील नमुद निकषावर क्रम लावला जाईल.
वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेवून कागदपत्राच्या पडताळणीसाठी पात्र करण्यात आलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनानुसार त्यांच्या कागदपत्राच्या छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मुळ कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्राच्या छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्याचे निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही.

निवड झालेले उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे शारीरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक ०४/०३/२०१७ ते १६/०३/२०१७ |
| २ | बँकेत विहीत चलनाव्दारे परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १७/०३/२०१७ |
| ३ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | २०/०३/२०१७ पासून दिनांक २२/०३/२०१७ |
| ४ | लेखी परीक्षा | २६/०३/२०१७ |

**विशेष सुचना :-**

१. या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतेही कागदपत्र सादर करायची आवश्यकता नाही तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकरण अर्ज करु नये.

२. अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात अडचणी असल्यास त्यासाठी ०७२१२५५३९२० या दुरध्वनीवर संपर्क साधावा (भरती प्रक्रीयेत अर्ज भरण्याकरीता कुठलीही माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुरविली जाणार नाही .

३. भरती प्रक्रीयेसंबंधिची संपूर्ण माहिती हि www.Collnrs.in या वेबसाईटवर असेल ती पाहण्याची जबाबदारी ती पूर्णतः उमेदवारांची असेल त्याकरीता प्रशासन जबाबदार राहणार नाही.

४. उमेदवाराला भरती प्रक्रीये संबंधितच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

दिनांक :- ०१ / ०३ /२०१७

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा प्रशासन अधिकारी
नगरपालीका प्रशासन विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय
अमरावती

अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी अमरावती

# जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती

## नगरपरिषदांमध्ये व नगरपंचायत राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहिरात.

जाहिरात क्र.कक्ष-२०/स्थानि/अका/संवर्ग पदभरती/कावि- ३०० /२०१७ दिनांक ०१/०३/२०१७

मा. प्रधान सचिव नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे परिपत्रक क्र.नपप्रस २०१५/ प्र.क्र. ११४/ २०१५ /कक्ष-६ /४३१ दिनांक २२/०2/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी अमरावती यांचे आस्थापनेवरील अमरावती जिल्हयातील नगरपरिषदांमध्ये राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी क मधील रिक्त पदे **सरळसेवेने** भरावयाचीआहे. त्यानुसार इच्छुक व पात्र उमेदवाराकडून **दिनांक १६/ ३ / २०१७** पर्यंत फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

कार्यालयाचे नाव : जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती

एकुण रिक्त पदे - २५ पदनिहाय रिक्त पदाचा तपशील खालीलप्रमाणे

**1)संवर्ग : महाराष्ट्र न.प. अभियांत्रिकी सेवा (विद्युत)**

२) पदाचे नाव : विद्युत पर्यवेक्षक

३) भरावयाची एकुण पदे :- २

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | -- | - | - | १ |
| वि.जा.(अ) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | | - | - | - | - | - | - | - | - |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकुण | २ | - | - | - | - | - | -- | - | २ |

वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग असाधारण क्रमाक -१४ ,Urban Development Department मंत्रालय दिनांक २८ जानेवारी २०१० चे अधिसूचने मधील अ.क्र. ७ मधील Serial No.३ मधील ( C ) नुसार लेखापाल व लेखापरिक्षक पदाकरीता दिलेली पात्रता

**<u>नगरपरिषद मधील पदांकरीता</u>**

**2) संवर्ग : महाराष्ट्र न.प. लेखा परीक्षण व लेखा सेवा सहाय्यक लेखापाल**

१) पदाचे नाव : सहाय्यक लेखापाल -2 / सहाय्यक लेखापरीक्षक : 3

२) भरावयाची एकुण पदे : 5

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | २ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| एकुण | ५ | १ | - | - | - | - | - | - | ४ |

वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

**<u>नगर पंचायत मधील पदांकरीता</u>**

१) पदाचे नाव : - लेखापाल

२) भरावयाची एकुण पदे :- 4

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | १ | ० | - | - | - | - | - | - | १ |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | - | - | - | - | - | - | - | - | - |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | २ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| एकुण | ४ | १ | - | - | - | - | - | - | ३ |

१ - : पदाचे नाव (लेखापरीक्षक

२) भरावयाची एकुण पदे : 4

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | - | - | - | - | - | - | - | - | - |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | २ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| एकुण | ४ | १ | - | - | - | - | - | - | ३ |

वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमाधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून 50% पदे राखीव राहतील.तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

संचालक अग्निशमन सेवा ,महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,मुंबई दिनांक २६ एप्रिल २०१६ चे परिपत्रक क्रमांक मअसे/२०१६/ ३२- एफ /६५५ नुसार मुंबई येथील सब ऑफीसर्स कोर्स चे प्रमाणपत्र असलेले उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करु शकतील

**3) संवर्ग : महाराष्ट्र न.प. अग्निशमन सेवा**

१) पदाचे नाव : सहा. अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक श्रेणी क -२ २) भरावयाची एकुण पदे : 12

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन | अपंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०% | १५% | ५% | ३% | २% | १०% | ३% | |
| अनु.जाती | ० | ० | - | - | - | - | - | - | - |
| अनु. जमाती | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| वि.जा.(अ) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - | |
| भ.ज. (क) | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भ.ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इ.मा.व | ३ | १ | - | - | - | - | - | - | २ |
| विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खुला | ४ | २ | १ | - | - | - | १ | - | - |
| एकुण | १० | ३ | १ | - | - | - | १ | - | ५ |

वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

अमरावती जिल्हयातील नगर परिषदेतील व नगर पंचायती मधील राज्य स्तरीय संवर्गातील रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक ४/३/२०१७ ते १६/३/२०१७ |
| २ | बँकेत विहीत चलनाव्दारे परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १७/३/२०१६ |
| ३ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | २०/३/२०१७ पासून दिनांक २२/३/२०१७ |
| ४ | लेखी परीक्षा | २६/३/२०१७ |

**विशेष सुचना :-**

सदर पदभरतीची संपूर्ण जाहिरात जिल्हाधिकारी कार्यालयाचे www.amravati.nic.in या वेबसाईटवर व www.collnrs.in या वेबसाईटवर पाहायला मिळेल अर्ज फक्त www.collnrs.in या वेबसाईटवर भरता येईल.

दिनांक :- ०१/०३/२०१७

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा प्रशासन अधिकारी
नगरपालीका प्रशासन विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय
अमरावती